# योगायोग

प्रकाशित: कुंभश्री दिवाळी अंक २०११

## रत्नाकर वाणी

पुनरारंभ

© पुनरारंभ

**website:** http://www.rajratna.co.in **Email:** ratnakar.wani@rajratna.co.in

# योगायोग

मंगल कार्यालय निमंत्रित, सगे सोयरे व नातेवाईकांनी पूर्ण भरले होते. दाराशी सनई चौधडयाचे मंगल सूर निनादत होते करवल्या आणि बालचमू नविन कपडे घालून उगाचच इकडे तिकडे फिरत होते, आपसात दंगामस्ती करित होते. गादीवर उडया मारून लोळण घेत होते. नविन कपडे खराब होतील, कुणी रागावेल याची त्यांना चिंता नव्हती. वधू वरांचे पालक निमंत्रितांचे स्वागत व पाहुण्यांची सरबराई करण्यात मग्न होते. अभिवादन करता करता मध्येच थोडीशी चेष्टा मस्करी पण चालली होती. एकंदरित सर्व वातावरण मंगलमय उत्साहाचे व आनंदाचे होते. वरात वाजत गाजत कार्यालयाचे दाराशी आली. सवाष्णींनी वराचे औक्षण केले व वर बोहल्यावर चढला. भटजींनी मंगलाष्टके म्हणत विवाह सोहळयास सुरवात केली. प्रत्येक मंगलाष्टकाच्या शेवटी 'शुभ मंगल सावधान' हे शब्द उच्चारताच वधूवरांच्या डोक्यावर अक्षता पडू लागल्या. बरोबर सकाळी ११.४० च्या सुमुहुर्तावर विवाह संपन्न झाला. शेवटचे मंगलाष्टक 'तदेव लग्नं सुदिनंच देव ताराबलं चंद्र बलंच देव' संपताच भटजींनी शुभ मंगल सावधान हे शब्द उच्चारले. बँड पथकाने एकच जल्लोष केला. बाहेर फटाक्यांची आतीष बाजी झाली.

विवाह संपन्न झाल्यावर वधूवर स्टेजवर त्यांच्यासाठी मांडलेल्या आसनावर आसनस्थ झाले. निमत्रितांपैकी काही जण वधूवरांचे अभिनंदन करण्या रांगा लावून होते तर काही जण खाली भोजन कक्षाकडे गेले. ज्याची त्याची आपली एकच घाईभोजनकक्ष लहान तर निमंत्रित जास्त असे व्यस्त प्रमाण झाल्यामुळे मेळ बसत नव्हता म्हणून घाईने परतर्णायांसाठी बफे पध्दतीने जेवणाची वेगळी व्यवस्था केली होती.

निळकंठ राव व नलिनीताईंना लग्न लावून लगेचच परतायचे असल्यामुळे बफे साठी रांग लावून जेवणाचे ताट घेतले. निळकंठराव जेवणाचे ताट घेउन जागेच्या शोधात असतांना कुणाचा तरी धक्का लागला ते पडता पडता सावरले. परंतु ताटातील गरम आमटी व भात पायावर सांडल्याने त्यांचा पाय भाजला शिवाय कपडे देखिल खराब झाले.

अशातच एक पंचवीशीतील तरूण पुढे सरसावला व त्यांना आधार देत म्हणाला ,

"काका तुम्ही येथे बसा मी तुमचे ताट आणतो" असे म्हणत त्याने त्यांचेसाठी ताट वाढून आणले.

ताट हातात देत त्याने विचारले "तुम्हाला काही इजा तर झाली नाही ना ?"

"नाही, फक्त गरम आमटी सांडल्यामुळे पायाची बोटे भाजल्या सारखी वटतात एवढेच" काकांनी उत्तर दिले.

तरूणाने ताबडतोब तांब्याभर गार पाणी आणून त्यांच्या पायावर टाकले व म्हणाला "आता तुम्हाला बरे वाटेल बघा."

एवढे करून तरूण गर्दी मध्ये केव्हा दिसेनासा झाला ते कळलेच नाही. त्यामुळे त्याचे आभार मानण्याचे पण विसरले. निघतांना त्यांनी त्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला पण अयशस्वी झाला. शेवटी त्यांनी कार्यालयातून काढता पाय घेतला पण मनात रूखरूख राहिली.

.

कार्यालयापासून थोडे अंतर चालून गेल्यावर रस्ता पार करित असतांना चौकातच भर वेगात येर्णाया एका टेंपोचा नलिनी ताईंना जरासा धक्का लागला व त्या खाली पडल्या. सुदैवाने थोडीशी खरचट व मुकामार या पलिकडे मोठी दुखापत झाली नाही. आजूबाजूला बघ्यांची गर्दी जमा झाली. निळकंठराव मदतीच्या अपक्षेने सर्वांकडे पाहत होते पण कोणी पुढे येईना. टेंपोचालक टेंपोसह केव्हा पसार झाला ते कोणालाच कळले नाही. अशातच कार्यालयात त्यांना मदत केलेला तोच तरूण सुदैवाने तेथे आला. त्याने ओळखले व कोठलाच विचार न करता लगेच रिक्षा बोलावून काकुंना जवळच्या हॉस्पिटल मध्ये दाखल केले. निळकंठरावांची मनस्थिती घाबरलेली असल्याने त्यांनी त्या तरूणास ओळखले पण त्याची ओळख करण्याचे भान राहिले नाही. डॉक्टरांनी काकूंची तपासणी केली व कोणतीही गंभीर इजा नसल्यामुळे केवळ निरीक्षणासाठी एक दिवस हॉस्पिटल मध्ये रहाण्याचा सल्ला दिला.

सर्व स्थिरस्थावर झाल्यावर काकांच्या विषयी विचारपूस करून "आपल्या कोणी नातेवाईकांना अथवा जवळच्या व्यक्तिला बोलावयाचे काय ?" तरूणाने विचारले.

काकांनी खिशातील डायरी काढून आपली कन्या, मनिषाचा नंबर देत तिला बोलविण्याची विनंती केली. तरूणाने फोनवर आपला परिचय देत थोडक्यात सर्व हकिकत सांगितली. थोडीशी दुखापत या पलिकडे काही झालेले नाही याची कल्पना देत फोन ठेवला.

मनिषा बॅंकेत आपल्या कामात मग्न होती. फोन वरील बोलणे ऐकून घाबरली व बॅंकेतील आपल्या सहकर्यासमवेत १५२० मिनिटातच हॉस्पिटल मध्ये हजर झाली. येताक्षणीच चौकशी कक्षाजवळ आईची चौकशी करू लागली. त्यावेळी तो तरूण तेथेच उभा होता. हिच मनिषा असावी याची खात्री करित म्हणाला, " मी अविनाश परचुरे मीच तुम्हाला फोन केला. घाबरू नका. तुमच्या मातोश्री दुर्सया मजल्यावर खोली नं २०४मध्ये आहेत व पूर्णतया र्बया आहेत. काळजी करण्याचे काहीच कारण नाही". त्याच्या बोलण्याकडे फारसे लक्ष न देता ती भराभरा जिना चढून वर गेली. आईला कधी भेटते न कधी नाही असे तिला झाले होते.

आईला पाहताच तिच्या जवळ जाउन तिने अधिरतेने काळजीच्या सुरात प्रश्नांची सरबत्ती चालू केली. "आई कशी आहेस तू? काय झाले तुला ? ठिक आहेस ना ?" वगैरे वगैरे.

मध्येच निळकंठरावांनी तिला थांबवत सर्व खुलासा केला व तिच्या प्रश्नांची उत्तरे दिली. सर्व ठिकठाक झाल्याचे पाहून अविनाशने त्यांचा निरोप घेतला. जातांना काकुंना "लवकर र्बया व्हा!" अशा शुभेच्छा देण्यास विसरला नाही.

दुसरे दिवशी अविनाश ने हॉस्पिटल मध्ये काकूंची तब्येतीविषयी विचारणा करणेसाठी फोन केला असता त्यांना सकाळीच सोडल्याचे समजले. आईची प्रकृति ठिक नसल्यामुळे मनिषा सुटीवर होती. दुपारी घरी निवांत असतांना तिचा मोबाईल वाजला. तिकडून विचारणा झाली. "हा मनिषाचा नंबर आहे काय ?"

"होय" ती म्हणाली.

"मी अविनाश बोलतोय. सकाळी हॉस्पिटल मध्ये फोन केला होता. काकूंना डिस्चार्ज दिल्याचे समजले. आता त्यांची प्रकृति कशी आहे ?"

"ठीक आहे नुकतीच औषध घेउन झोपलीय़" मनिषाने उत्तर दिले.

"आपण कोण, आपली ओळख ?" मनिषाचा प्रतिप्रश्न.

"मी अविनाश परचुरे काल आपण हॉस्पिटल मध्ये भेटलो होतो." इति अविनाश.

" असे होय. दिलेल्या सहकार्याबद्दल धन्यवाद." मनिषा म्हणाली.

"अहो, त्यात काय एवढे माणसाने माणसाची मदत करायची नाही तर कोणाची. मी तर माझे एक कर्तव्य केले". अविनाश म्हणाला.

"अहो तुमच्या मुळेच तर आईला वेळेवर उपचार मिळाले हे काय कमि आहे" मनिषा म्हणाली.

विषयानुरूप गप्पा झाल्यावर घराचा पत्ता देत मनिषा ने एकदा घरी येण्याचे निमंत्रण दिले. त्याने पण वेळे नुसार येण्याचे आश्वासन देत संवाद संपला.

अविनाशची सहकारी वृत्ती व गोड बोलणे मनिषाला आवडले. नंतर त्यांचे वारंवार फोनवर संभाषण होत राहिले. भेटी झाल्या व ते एकमेकाच्या प्रेमात केव्हा व कसे पडले ते उभयतांना पण कळलं नाही. दिवसेंदिवस त्यांच्या प्रेमाला बहर येत गेला. चंद्राच्या कले प्रमाणे वाढत गेले. पण याची उभयतांच्या घरी कधी कुण कुण पण लागली नाही.

एके दिवशी संध्याकाळी एकत्र जेवणास बसले असता मनिषाने अविनाशचा फोन आल्याचे सांगितले. त्यावेळी निलीमा ताई म्हणाल्या, " अविनाश छानच मुलगा वाटला. किती मदत केली आपल्याला. असाच हुषार, होतकरू, सुशिक्षित व सुस्वभावी जावई मिळाला तर कीती बरे होईल नाही."

" मिळेल, जरूर मिळेल, तिच्या भाग्यात असेल तर असाच जावई मिळेल. या योगा योगाच्या गोष्टी आहेत. योग जुळून आले तर सर्व काही सुरळीत होईल. काळजी करण्याचे कारण नाही." निळकंठरावांनी पुस्ती जोडली.

या घटनेला एकाद वर्ष लोटले असेल. असेच एका रविवारी निळकंठराव सकाळी पेपर वाचत असतांना फोनची घंटी वाजली. निळकंठरावांनी फोन उचलला. तिकडून आवाज आला "हॅलो ओळखले कां? मी नाशिकहून केशव परचुरे बोलतोय."

"कोण परचुरे ?" निळकंठरावांचा प्रतिप्रश्न.

“अरे! नाशिकला गोदावरी कॉलेजला आपण बरोबरच शिकत होतो. आठवते का ?” पलिकडून पत्युत्तर आले.

”अरे! हो केशा,कसा आहेस तु?आणि एवढया दिवसानंतर कशी काय आठवण झाली रे ?” इति निळकंठ राव.

“मी ठीक आहे”. कालच मला यशवंत फडके कडून तुझा हा नंबर मिळाला. तु पुण्यास असल्याचे समजले. माझा पुतण्या पुण्यास सॉफ्टवेअर इंजिनिअर आहे. त्याला भेटावयास पुढच्या महिन्यात पुण्यास येण्याचे म्हणतो. म्हटले बघू हा फोनवर तरी भेटतोय का ?” इति केशव.

“हो, ये ना! येण्यापुर्वी फोन करून ये. म्हणजे मी त्यावेळी काठे जाणार नाही.” निळकंठरावांनी आपला फोन नंवर व पत्ता देत फोन ठेवला.

साधारण महिना भराने सकाळी १0चे सुमारास दारावरची बेल वाजली. मनिषाने दार उघडले. दारात एक पांढरा नेहरू शर्ट व पायजमा घातलेले पन्नाशीचे गृहस्थ सपत्निक उभे होते.

“निळकंठ कुळकर्णी येथेच राहतात काय ?” गृहस्थांनी विचारले.

“होय,”मनिषाने उत्तर दिले.

“मी केशव परचुरे नाशिकहून आलोय.” गृहस्थ म्हणाले.

मनिषाने दार उघडत .“या नं! बसा” असे म्हणत घरात गेली व बाहेर केशव परचुरे आल्याची वर्दी दिली.

काही क्षणातच निळकंठराव बाहेर आले.केशवला पााहत विस्मय करित म्हणाले, “अरे केशवा तू? , कधी आलास? येण्या आधी फोन तरी करायचास की.”

“मी काल सकाळीच आलो. माझा पुतण्या येथे आहे त्याच्या घरी होतो” केशवने उत्तर दिले.

थोडयाच वेळात नलिनीताई व मनिषा हातात पाण्याचा ग्लास घेउन प्रवेश करते झाले. निळकंठरावांनी मनिषा व नलिनीताईची ओळख करून देत म्हणाले “ही माझी एकुलती एक मुलगी मनिषा व या आमच्या सौ.”

तव्दत केशवरावांनी देखिल आपली व पत्नी सौ.निर्मलाची ओळख दिली. मनिषाला बॅकेत जाण्याची घाई असल्यामुळे ती निघून गेली. गत आठवणी व काही कौटुंबिक विषयावर गप्पा झाल्या. बोलता बोलता केशवराव सहजच म्हणाले “ मनिषाच्या लग्नाबद्दल काही विचार झालाय का नाही.”

“होय, काही स्थळे आली होती पण काही ठिकाणी पत्रिका जुळत नाही, शिक्षण कमि, वयात बसत नाही अशा एक ना अनेक कारणे लांबत चाललंय. पण योग जुळुन आल्यास लगेच उरकून टाकू.”इति निळकंठराव.

थोडयाफार गप्पाटप्पा झाल्यावर केशवरावांनी निरोप घेतला. जसजसा उभय घरांचा घरोबा वाढत होता तसतसे अविनाश व मनिषाचे प्रेमप्रकरण बारसे धरत होते.

रविवारी निळकंठराव व नलिनीताईंच्या लग्नाची ३0 वी वर्ष गाठ असल्यामुळे त्यांना निमंत्रण देण्यास मनिषा शनिवारी बॅकेतून परस्पर केशवकाकांचे घरी गेली. केशव काका व काकू कामानिमित्त बाहेर गेले होते. अविनाश एकटाच घरी होता. दारावरची बेल वाजल्यावर अविनाशने दरवाजा उघडला. मनिषाला दारात पाहून विस्मयचकित होत म्हणाला " अरे! मनिषा तु इकडे कशी?" .

अविनाशला पाहून मनिषा पण विस्मयचकित झाली. तिने पण तोच प्रश्न अविनाशला करित म्हणाली, " आणि तु पण इथे कसा ?"

केशव परचुरे व त्याचे काका पुतण्याचे नाते असल्याचे अविनाशने स्पष्ट करून तिचा विस्मय दूर केला.

"अरे वा ! काय सांगतोस काय " म्हणत तिने प्रतिसाद दिला.

"वरं कसे येणे केले अचानक?" त्याने विचारले.

" अरे! उद्या आई बाबांच्या लग्नाचा ३0 वा वाढदिवस आहे म्हणुन तुम्हाला आमंत्रण द्यायला आले होते."

निमंत्रणाचे सोपस्कार झाल्यावर उभयतांच्या गप्पा रंगल्या. इतक्यात काका आणि काकू घरी आले.

निरोप घेत मनिषा म्हणाली, "काकू येते मी"

"अगं पण कशासाठी आली होती ते तरी सांगशील की नाही." निर्मला काकूंनी विचारले.

"अरे हो! विसरलेच की!"म्हणत तिने परत काकूंना निरोप दिला. "दुपारचे जेवणासाठी सर्वा ंनी नक्की या हं !" म्हणत मनिषा निघाली.

"हो सर्व जण नक्की येउ हं." आमंत्रण स्विकारत व येण्याचे आश्वासन देत काकू म्हणाल्या.

रविवारी सकाळी केशव परचुरे कुटुंबिय वेळेवर निळकंठरावांकडे आले. त्यांचे सोबत आलेल्या तरूणाकडे विस्मयचकित नजरेने निळकंठराव व निलिमा ताई पाहतच राहिले. त्यांना एक वर्षापूर्वी भेटलेल्या तरूणाची व त्याने केलेल्या मदतीची आठवण झाली. कदाचित तो हाच तर नाही ना असा संभ्रम त्यांचे मनी आला. त्यांचे चेह-यावरील विस्मयचकित भाव पाहून, त्यांचा संभ्रम दूर करित, अविनाशची ओळख करून देत म्हणाले, "हा अविनाश माझा पुतण्या येथेच एका कंपनीत सॉफ्टवेअर इंजिनिअर आहे."

"आम्ही यांना एक वर्षापूर्वी एका मंगल कार्यालयात भेटलो आहे. तदनंतर सौ.स झालेल्या छोटयाशा अपघाता वेळी यांनीच आम्हाला मदत केल्याचे आठवते." निळकंठराव म्हणाले.

"होय काका मीच तो" अविनाशने पुस्ती जोडली. " त्यावेळी मी तेथे माझ्या मित्राच्या बहिणीच्या लग्नासाठी तेथे आलो होतो".

“अरे! हे काय सहसा तो मी नव्हेच म्हटले जाते आणि तु प्रामाणिक पणे चक्क मीच तो असल्याचे म्हणतोस” किती भोळा आहेस रे तु?” निळकंठराव गमतीने म्हणाले.

“होय काका खरे आहे” अविनाश उत्तरला.

“म्हणजे तु भोळा आहेस का?” निळकंठराव परत म्हणाले.

“ नाही नाही तसे काही नाही” अविनाश सारवासारव करित म्हणाला.

सहजगत्या झालेल्या या विनोदी संवादामुळे सर्वजण हसले.

दुपारी जेवणे आटोपल्यावर निवांत समयी सर्वजण गप्पा मारत असतांना मनिषा व अविनाशच्या लग्नाचा विषय निघाला. केशवराव पण आपला पुतण्या अविनाशसाठी वधू संशोधन करित असल्याचे म्हणाले. निर्मला काकूंना मनिषा पाहता क्षणीच आवडली होती. त्यांनी सहजच अविनाशचा मनिषासाठी प्रस्ताव मांडला. अविनाशचा मृदुल स्वभाव व सोज्वळ वर्तणूक आधीच निळकंठराव व नलिनी ताईंना आवडली होती.

नलिनीताईच्या तोंडून सहजच शब्द निघाले “जर अविनाश व मनिषाची पसंती असेल तर आमची काहीच हरकत नाही.”

या वाक्यावर समोर बसलेले अविनाश व मनिषा यांचे मनासारखे होत असल्यामुळे दोघांच्या मनी आनंदाचे लाडू फुटले. काही न बोलता खाली मानेने मूक संमति प्रदर्शित केली. निळकंठराव व नलिनीताईनी नजरेनेच मनिषाकडे तिच्या सहमतीच्या दृष्टिने तिरपा कटाक्ष टाकला. मनिषा लाजली. तिचे गाल लाजेने लाल झाले व घरात पळून गेली.

सर्वांनी काय ते त्यांच्या मनातले ओळखले. त्यानुसार बोलणी झाली. जवळचा मुहुर्तपण काढला गेला व योगायोगाने त्याच कार्यालयात उभयतांचे लग्न लागले. शर्वकाही व्यवस्थित पार पडले. मनिषा सासरी गेली.

आठवडया भराने निवांत गप्पा मारत असतांना निळकंठराव नलिनीताईना मागील बोलण्याची आठवण करून देत म्हणाले, “आठवतंय तुम्हाला, मी म्हणालो होतो ना, मिळेल, जरूर मिळेल, तिच्या भाग्यात असेल तर असाच जावई मिळेल. या योगा योगाच्या गोष्टी आहेत. योग जुळून आले तर सर्व काही सुरळीत होईल. काळजी करण्याचे कारण नाही.”